# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## ई - कोटेशन नोटीस क्र. ०४

दि.०४/०७/२०१९

निम्नलिखित तपशीलाप्रमाणे नाशिक महानगरपालिका,नाशिक कार्यक्षेत्रात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यान्वित एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीचे CPMU मधील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता शहरातील सर्वंकष प्रजनन व माता बाल संगोपन कार्यक्रमाच्या तसेच राष्ट्रीय कार्यक्रमांच्या अंमलबजावणी व पर्यवेक्षण कामी एक वाहन चालकासह ३१/०३/२०२० अखेर (सेवा समाधानकारक मिळालेस पुढील आर्थिक वर्षात आवश्यकतेनुसार वाहन भाडेतत्वावरचा कालावधी वाढविणेत येईल) कालावधीसाठी मासिक किलोमिटर भाडेतत्वावर घेणेकामी अनुभवी खाजगी, एजन्सीज/ट्रान्सपोर्ट कंपनी यांचेकडून वरील कालावधीकरीता सीलबंद कोटेशन मागविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| कोटेशन फॉर्म ऑनलाईन प्रसिध्दीची तारीख | : | ०५/०७/२०१९ |
| कोटेशन अंतिम तारीख | : | १२/०७/२०१९ |

**<u>कोटेशन जमा करण्याचे ठिकाण :-</u>** कोटेशन फॉर्म पुर्ण भरुन सार्वजनिक आरोग्य विभाग, राजीवगांधी भवन येथे कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते ५.४५ पर्यंत) देण्यात यावे. अपुर्ण कोटेशन स्विकारले जाणार नाहीत. कोटेशन फॉर्म स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क राखुन ठेवण्यात येत आहे.

Sd/-
(डॉ.राहूल गायकवाड)
वैद्यकिय (आरोग्य) अधिकारी,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

## नियम व अटी

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, अंतर्गत नाशिक महानगरपालिका, एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीचे CPMU मधील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता शहरातील सर्वकष प्रजनन व माता बाल संगोपन कार्यक्रमाच्या तसेच राष्ट्रीय कार्यक्रमांच्या अंमलबजावणी व पर्यवेक्षण कामी खालील वर्णनाचे एक वाहन चालकासह ३१/०३/२०२० अखेर (सेवा समाधानकारक मिळालेस पुढील आर्थिक वर्षात आवश्यकतेनुसार वाहन भाडेतत्वावरचा कालावधी वाढविणेत येईल) कालावधीसाठी मासिक किलोमिटर भाडेतत्वावर घेणेकामी अनुभवी खाजगी, एजन्सीज/ट्रान्सपोर्ट कंपनी यांचेकडून वरील कालावधीकरीता सीलबंद कोटेशन मागवित आहोत. कोटेशन देणेस इच्छुक असणा-यांनी आपले कोटेशन खालील प्रमाणे सादर करावेत.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | आवश्यक वाहन संख्या | वाहन मॉडेल |
|---|---|---|---|
| १ | Air Condition 4 wheeler | १ | एक ते तीन वर्षाच्या आतील |

१. सदर वाहन नाशिक जिल्हा परिवहन परवाना व आरटीओ टुरिस्ट परवाना असणे आवश्यक आहे.

२. दरपत्रक देताना कोणत्याही अटी, शर्ती घालून दरपत्रक देणेचे नाही. तसे केलेस दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

३. कोणतेही कारण न देता दरपत्रक नाकारणेचे अधिकार मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

४. दरपत्रक दिनांक / /२०१९ पर्यंत सायंकाळी ६ वाजेपर्यंत वैदयकिय आरोग्य अधिकारी नाशिक महानगरपालिका यांचे नांवे एनयुएचएम कार्यालय, सार्वजनिक आरोग्य विभाग, ३ रा मजला राजीव गांधी भवन, शरणपुर रोड नाशिक. येथे जमा करावे.

५. या वाहनाचे उत्पादन ३ वर्षांच्या आतील असावे व नाशिक जिल्हा परिवहन ऑफिस कडे एक वर्षाचे आतील नोंदणी असावे.

६. कामाचा (कराराचा) कालावधी ३१/३/२०२० अखेर राहील. (सेवा समाधानकारक मिळालेस आवश्यकतेनुसार पुढील आर्थिक वर्षात कालावधी वाढविणेत येईल.)

७ खालील बाबीवरील खर्च कंत्राटदाराने/वाहनधारकाने करावयाचा आहे.

अ) पेट्रोल/डिझेल, ऑईल व ल्युब्रीकंट इ.
ब) वाहनाची दुरुस्ती व दैनंदिन मेंटेनंस करणेचा आहे.
क) चालकाचा मासीक पगार, टी.ए.डी.ए. बोनससहीत सर्व देय राहील (सर्व प्रकारचे देय)
ड) टोल, टॅक्स व पार्कींग चार्जेस व सर्व प्रकारची इंशुरंस रक्कम.
इ) सर्व अधिभार, कर, लेव्ही कंत्राटदाराला अदा करावी लागेल.
ई) जीएसटी

८ वाहन दरपत्रक सादर करणा-याच्या मालकीचे असावे.

९ प्रत्येक दिवसास दहा तास प्रमाणे व १८०० कि.मी./महा भाडयाचा दर राहील. तसेच जादा कि.मि.चे दर **फॉर्म ए** मध्ये नमूद केलेल्या रकान्यात दर्शविणेत यावे.

१० कार्यालयीन कामकाजासाठी वाहन १० तास म्हणजे सकाळी ९ ते रात्री. ७ पर्यंत उपलब्ध ठेवणे बंधनकारक राहील.

११ वाहनांच्या सर्व दायित्वांची विमा पॉलीसी/फुल्ल इंशुरन्स असणे बंधनकारक आहे.

१२ चालकाचा वाहन चालविण्याचा परवाना मुदतीत असणे आवश्यक आहे.

१३ करार कालावधीमध्ये कोणत्याही कारणाने वाहन ठरलेल्या वेळेत उपलब्ध करुन न दिल्यास पहिला एक तास वगळता पुढील प्रत्येक तासासाठी किंवा तासाच्या भागासाठी रु. १००/- (अक्षरी रु. शंभर फक्त) इतकी दंडात्मक रक्कम देय रक्कमेतून वजा केली जाईल. अथवा वसुल केली जाईल. याबाबतचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष तथा आयुक्तसो, नाशिक महानगरपालिका, एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी नाशिक यांचेकडे राहील.

१४ कार्यालयीन सुचनेप्रमाणेच वाहनाचा वापर करावा लागेल. प्रचलीत शासकीय नियम व आचार संहितेचे पालन करावे लागेल. वाहनाचा अवैध वापर करता येणार नाही. इकडिल वर्दीमध्ये असताना पूर्वपरवानगी

शिवाय खाजगी वापर करता येणार नाही. तसेच सुट्टीचे दिवशी कार्यालयाकडील गरजेनुसार वाहन पुरविणे बंधनकारक राहील.

१५ कोणतेही कारण न देता ७ दिवसाची सुचना देऊन वाहनासाठी केलेला करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार मा.अध्यक्ष तथा आयुक्तसो नाशिक महानगरपालिका, एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी नाशिक यांनी राखून ठेवला आहे.

१६ नाशिक महानगरपालिका, एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी नाशिक कार्यालयाने मागणी केलेस निविदा धारकाने आयकर क्लिअरन्स सर्टिफिकेट सादर करणे आवश्यक राहील.

१७ निविदा धारकांच्या मासीक बिलातून प्रचलीत शासकीय नियम व कायदयानुसार कराच्या लागणा-या सर्व कपाती, करुन देयक अदा केले जाईल.

१८ वाहनधारकाने कार्यालयास पुरवावयाच्या कंत्राटी वाहनामध्ये कार्यालयाचे सुचनेप्रमाणे फेर-फार करुन देणे व आवश्यक मजकूर स्वखर्चाने वाहनावर लिहणे बंधनकारक आहे.

१९ वाहनधारकाने कार्यालयास पुरविलेल्या कंत्राटी वाहनावर प्रकल्पाचे नांव लिहणे बंधनकारक राहील.

२० परगांवी प्रवासाचे वेळी मुक्काम पडलेस वाहनचालकाचा संपूर्ण खर्च वाहनधारकाने करणेचा आहे.

२१ आपणास अदा करणेत आलेले मासीक भाडेतून लागू होणारी जीएसटी रक्कम शासनास भरणा करुन त्याची प्रत इकडील कार्यालयास सादर करणे अनिवर्य राहील.

२२ दरपत्रकामध्ये भरलेले दर, कराराच्या कालावधीकरीता राहतील. याबाबत कसलीही तडजोड केली जाणार नाही.

२३ दरमहा भाडयाच्या देयकानुसार आवश्यक त्या करांची इत्यादीच्या वसूली नंतर पीएफएमएसद्वारे रक्कम खात्यावर जमा करणेत येईल.

२४ करारानुसार देय रक्कम, वाहन वापराच्या १ महिन्यानंतर १५ दिवसात प्रदान केली जाईल तथापी काही कारणामुळे प्रदानास विलंब झाल्यास त्याबाबत भरपाईची मागणी करता येणार नाही. यासाठी कॅलेंडर महिना विचारात घेतला जाईल.

२५ वाहनधारकाने वाहनचालक किमान दोन वर्षे अनुभव असलेला शक्यतो नाशिक शहरातील रहिवासी असावा तसेच वाहनचालकाचे मेडिकल फिटनेस व निर्व्यसनि असला पाहिजे. वाहनचालक नियमित असावा. (वाहनचालक वारंवार बदलणेत येऊ नये.)

२६ वाहनाचे टेंडर मंजूरी नंतर त्वरीत करार करुन देणेचा आहे.

२७ परगांवी प्रवासाचे वेळी वाहनचालकाने प्रवासाचे साहित्य व प्रवासामधील खर्च स्वतः करावयाचा आहे.

२८ ऑफिस सुट्टी/अधिकारी यांचे सुट्टीदिवशी वाहनाची आवश्यकता भासलेस तातडीने वाहनचालकासह वाहन उपलब्ध करुन देणेची जबाबदारी वाहनधारक यांचेवर राहील.

२९ वाहनचालकासंबंधी व वाहनासंबंधी तक्रार असलेस त्याचे निवारण करणेची जबाबदारी वाहनधारक यांचेवर राहील.

३० वाहनासोबत स्टेपनी,ई. गरजेचे साहित्य असणे आवश्यक आहे.

३१ वाहन कोणत्याही कारणास्तव ब्रेकडाऊन/अपघात किंवा इतर कोणतेही कारणास्तव वर्दीमध्ये असताना बंद पडलेस वाहनधारक यांनी आपल्या स्वखर्चाने अर्ध्या तासात दुसरी गाडी पुरविणेची आहे.

३२ प्रवासाचे वेळी वाहनांस अपघात झालेस वाहनाचे नुकसान,मनुष्यहानी झालेस त्यासंबंधी पोलिसकेस/कोर्ट केस व खर्च,इ.चा सर्व खर्च करणेची जबाबदारी वाहनधारक यांचेवर राहील.

३३ वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे वाहनचालकाचा परवाना तसेच आरटीओ/पोलिस खातेस सर्व आवश्यक असणा-या कागदपत्रांच्या छायांकित प्रति वाहनांसोबत असणे गरजेचे आहे.

३४ कार्यालयीन वापरावेळी वाहनचालकांस इतर वस्तू साहित्य व अन्य प्रवासी वाहनांमध्ये घेणेचे अधिकार असणार नाही.

३५ वाहनावरील वाहनचालकाचा गणवेष आर.टी.ओ.नियमानुसार असणे गरजेचे आहे.

३६ वाहनासोबत केलेला प्रवासाचा दररोजचा तपशिल समजणेकरीता वाहनचालकाने लॉगबुक मध्ये त्याच्या नोंदी ठेवणे गरजेचे आहे. त्यामध्ये दैनंदीन प्रवासाची माहिती, ठिकाण, कि.मी., वेळ, इ.च्या नोंदी करुन

संबंधीत अधिकारी/पदाधिकारी यांची स्वाक्षरी घेणे जरुरीचे आहे. करार संपतेवेळी लॉगबुक कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक राहिल.

३७ प्रवासामध्ये वाहन बंद पडलेस किंवा दुरुस्तीकामी बंद ठेवलेस,वापर झाला नसलेस त्या कालावधीचा बीलाकरीता विचार केला जाणार नाही.

३८ वाहनाचे स्पीडोमिटर कायमस्वरुपी चालू असणे गरजेचे आहे. यामध्ये कोणतीही सवलत दिली जाणार नाही.

३९ वाहन परगांवी जातेवेळी वैदयकिय (आरोग्य) अधिकारी यांची मान्यता असलेखेरीज वाहन घेऊन जाणेचे नाही. तसे न झालेस होणारे जादा कि.मी. प्रवासाचे बिलामध्ये समावेश केला जाणार नाही.

४० सदर मासीक देय मानधन हे रु.३०,०००/- पेक्षा जास्त देय राहणार नाही.

**वरील अटी बिनशर्त मान्य**
**कंत्राटदाराची सही**

Form “A”

**लेटर हेडवर**

**नाशिक महानगरपालिका,नाशिक राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान,**

**मासिक भाडेतत्वावर वाहन उपलब्ध करुन देणेसाठीचे- दरपत्रक,**

**सदर एअर कंडीशन गाडी तीन वर्षांचे आतील असावी. (प्रसिध्दीचे तारखेपर्यंत तीन वर्षे पूर्ण नसावे)**

| वाहनाचा तपशील | अंदाजित रक्कम रुपये | परिमाण | नमुद करावयाचा मासीक दर प्रतिमाह १८०० कि.मी. साठी व त्यापुढील कि.मी. साठी स्वतंत्र | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | युनिट | अंकी दर | अक्षरी दर |
| २. | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | ए.सी. | |
| १. कंपनी .. . | २७००००/-(दोन लाख सत्तर हजार) | १) | १८०० कि.मी. मासिक | रु | |
| २. मॉडेल.......... | | | | | |
| ३. मॉडेल वर्ष........ | | | | | |
| ४. प्रवासी वाहतूकीची क्षमता ........... | | | त्यापूढील प्रत्येक कि.मी. | | |
| ५. आर.टी.ओ. नोदणी नंबर ....... | | | | | |
| ६. आर.सी. बुक नंबर ............. | | | | रु | |
| ७. टी.सी. नंबर ....... | | | | | |
| ८. वाहन पात्रता प्रमाणपत्र (Fitness Certificate) | | | | | |
| ९. विमा पोलीसीचा कालावधी .......... | | | | | |
| १०. वाहन कर भरणेचा कालावधी ........ | | | | | |

**सुचना:-** १) वरील रकाना क्र. २ व रकाना क्र. ६, ७ मधील माहिती/दर खाडाखोड न करता स्पष्ट व सुवाच्च अक्षरात नमुद करावेत .

२) प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्र दरपत्रक भरणेत यावी.

वरील तपशीलातील वाहन निविदेतील अटी, शर्ती, नियम वाचून समजाऊन घेतले असून त्यांचे अधिन राहून दिनांक ३१/०३/२०२० अखेर कालावधीसाठी करारबध्द करणेस आम्ही बिनशर्त सहमत आहोत.

३) मुक्कामी वेटींग चार्ज, टोल नाका,पार्किंग चार्जसह दर भरणेचे आहेत.

४) कोटेशनबरोबर नियम व अटी मान्य असलेबाबत स्वाक्षरीची प्रत जोडणेत यावी.

स्वाक्षरी ............................................

वाहनधारकाचे नांव..................................

पूर्ण पत्ता ..........................................

दुरध्वनी क्रमांक ........... ..........................

मोबाईल क्रमांक.................................